standard chartered

पर्सनल लोन संबंधित सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती

1) या दस्तऐवजामध्ये स्टँडर्ड चार्टर्ड बँकेकडून (''बँक'') वैयक्तिक कर्जाशी संबंधित सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्ती दिल्या आहेत. या सर्वात महत्वाच्या अटी आणि शर्तींसह वैयक्तिक कर्जाशी संबंधित अटी (बँकेच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहेत – https://www.sc.com/global/av/in-scb-pl-terms-n-Conditions.pdf), ग्राहकांशी संबंधित अटी (बँकेच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहेत – https://www.sc.com/in/assets/pws/pdf/Client-Terms-and-condition) बँकेद्वारे वैयक्तिक कर्जाच्या तरतुदी संचालित करतात. बँकेकडून वैयक्तिक कर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी कर्जदाराने ते वाचले आणि समजून घेतले असल्याचे स्वीकारले पाहिजे. मुख्य अटी देखील बँकेच्या प्रतिनिधिने कर्जदाराला समजावून सांगितल्या आहेत. प्रत्येक कर्जदारासाठी वेगळे असलेले मुख्य माहिती दस्तऐवज बँकेद्वारे कर्जदाराला स्वतंत्रपणे प्रदान केले जाते.

2) कर्जदार बँकेला योग्य वाटेल अशा कोणाकडूनही (जसे की प्राधिकरण किंवा क्रेडिट रेफरेन्स किंवा रेटिंग एजेन्सी) कर्जदाराची कोणतीही माहिती किंवा क्रेडिट स्थिती सत्यापित करण्यासाठी अधिकृत करतो.

3) कर्जदार वैयक्तिक कर्जाची फेरतफेड इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंट्स (ईएमआय) द्वारे करेल आणि इलेक्ट्रॉनिक क्लियरेन्स सर्व्हिसेस (''ईसीएस'') किंवा स्टँडिंग इंस्ट्रक्शनची (स्थायी सूचनेची) निवड करेल. डिफॉल्टच्या (परतफेड करण्यास अपयशी ठरल्यास) बाबतीत थकित वैयक्तिक कर्जाच्या वसुलीसाठी बँकेद्वारे ईसीएस/स्टँडिंग इन्स्ट्रक्शन देखील सादर केल्या जातील.

4) बँकेने वैयक्तिक कर्ज नाकारल्यास कर्जदाराने बँकेला दिलेल्या वैयक्तिक कर्जासंदर्भात केवायसी कागदपत्रांसह सर्व किंवा कोणतेही कागदपत्रे बँक परत करणार नाही.

5) कर्जदार 12 ते 60 महिन्यांदरम्यान, बँकेला किमान 21 कामकाजाच्या दिवसांची लिखित स्वरूपात सूचना देऊन आणि देय देऊन, संपूर्ण वैयक्तिक कर्जाची प्रीपेमेंट (पूर्व मुदत देय) करू शकतो:

   अ. वैयक्तिक कर्जाची थकबाकी मूळ रक्कम; आणि

   ब. सर्व थकबाकी ईएमआय, व्याज, शुल्क आणि लागू कर; आणि

   क. शुल्काच्या शेड्युलमध्ये नमूद केलेल्या दरांवरील प्रीपेमेंट शुल्क बँकेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत– https://www.sc.com/in/deposits/schedule-of-charges/ ➔ Personal Loan.

   ड. कर्जाचे 12 महिने पूर्ण केल्यानंतर, अन्यथा बँकेने लेखी सूचित केल्याशिवाय.

6) कर्जदाराला वैयक्तिक कर्ज देण्याच्या उद्देशाने बँकेत खाते उघडताना किंवा बँकेकडून कोणतेही इतर उत्पादन किंवा सेवा घेताना कर्जदाराने दिलेल्या माहितीवर बँक विसंबून राहील आणि त्या माहितीचा वापर करेल. बँकेकडे दिलेली कर्जदाराची माहिती योग्य, पूर्ण आणि अद्ययावत असल्याची खात्री कर्जदाराने करावी. कर्जदाराने दिलेल्या कोणत्याही माहितीमध्ये बदल करायचा असल्यास कर्जदाराने 30 दिवसांच्या आत बँकेला सूचित करावे. स्थानांतर किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पत्ता बदलला असेल तर कर्जदाराने अशा प्रकारचा बदल झाल्याच्या दोन आठवड्यांच्या आत बँकेला नवीन पत्ता कळवावा.

7) लागू असलेल्या स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून, अन्यथा किंवा नियामक किंव प्राधिकारणांसह ऑर्डर्स (आदेश), करारानुसार कोणत्याही अधिकारक्षेत्रात कर्जदारांचे कर दायित्व स्थापित करणे आवश्यक असल्यास बँक किंवा तिचे सहयोगी (शाखांसह) कर्जदारांची माहिती देशातील किंवा परदेशी नियामक किंवा कर अधिकाऱ्यांसोबत सामायिक करु शकतात.

8) एखाद्या प्राधिकरणाने बँकेला तसे करण्यास सांगितले असल्यास, किंवा बँकेला कायद्यानुसार किंवा कोणत्याही नियामक किंवा कोणत्याही प्राधिकरणाशी केलेल्या करारानुसार आवश्यक असल्यास, किंवा बँकेला कोणत्याही संबंधित लागू आदेश किंवा प्राधिकरणाच्या मंजुरीसह अंतर्गत धोरणांचे पालन करणे आवश्यक असल्यास, बँक कधीही वैयक्तिक कर्ज खाते ब्लॉक करु शकते (आणि नंतर ब्लॉक काढून टाकू शकते).

9) ईएमआय वेवर/कॅश बॅक योजना – जर कर्जदाराने ईएमआय वेवर/कॅश बॅक योजनेची निवड केली असेल तर, कर्जाच्या संपूर्ण कालावधीत कोणत्याही कारणास्तव ईएमआय बाउन्स किंवा डिफॉल्ट किंवा ईएमआय देय करण्यास विलंब झाल्याची एकही घटना घडली नसेल तरच कर्जदार शेवटच्या ईएमआय वेवरसाठी/कॅश बॅकसाठी पात्र असेल. जर कर्जदाराने कर्जाची एकूण मुदत पूर्ण केली असेल तर शेवटचे ईएमआय वेवर लागू असेल आणि कर्जाच्या मुदतपूर्व बंदच्या स्थितीत थांबवण्यात येईल. बँकेचा निर्णय अंतिम असेल आणि कर्जदारासाठी बंधनकारक असेल. कोणतेही कारण न देता बँक कधीही ईएमआय वेवर/कॅश बॅक योजना बंद करु शकेल किंवा मागे घेऊ शकेल. बँक ईएमआय वेवर/कॅश बॅक योजनेअंतर्गत कर्जाची प्रक्रिया बँकेच्या विवेकबुद्धीनुसार आणि वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून करु शकते.

10) कर्जदार वैयक्तिक कर्जाचा वापर काटेकोरपणे नोंद केल्यानुसार अर्जात नमूद केलेल्या उद्देशासाठी करेल तसेच कोणताही सट्टा किंवा समाजविरोधी हेतूसाठी करणार नाही. जर बँकेच्या मते वैयक्तिक कर्जाचा वापर नमूद केलेल्या कारणाव्यतिरिक्त केला गेला असेल तर बँक वैयक्तिक कर्ज परत घेऊ शकते.

11) कर्जदार कोणत्याही बँकेच्या संचालकांशी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संबंधित नसावा किंवा भारतातील इतर कोणत्याही बँकेच्या संचालकांशी संबंधित नसावा. जर असे झाले नाही, तर कृपया त्याबद्दल बँकेच्या प्रतिनिधीला कळवा.

12) कर्जदार बँकेला कर्जदाराला दिलेल्या क्रेडिट सुविधांचे मासिक तपशील क्रेडिट माहिती कंपन्यांना (सीआयसी) प्रदान करण्यास अधिकृत करतो. अशा तपशिलांमध्ये कर्जदाराने बँकेला किती पैसे देणे बाकी आहे (जरी कर्जदाराने देय रकमेवर विवाद केला असेल किंवा कर्जाची रक्कम सेटल करण्यासाठी बँकेशी करार केला असेल) आणि कर्जदाराच्या परतफेडीचा इतिहास समाविष्ट आहे. कर्जदाराला इतर वित्तीय संस्थांद्वारे दिलेल्या क्रेडिट सुविधांचे तपशील देखील बँकेला सीआयसी कडून मिळू शकतात. बँक कर्जदाराला अतिरिक्त क्रेडिट सुविधा देऊ शकते की नाही हे निर्धारित करण्यासाठी बँक अशा माहितीचा वापर करेल. कर्जदाराचे खाते नियमित केल्यावर बँक सीआयसी ला याबाबत कळवेल. कर्जदार बँकेला योग्य वाटेल अशा कोणाकडूनही (जसे प्राधिकरण किंवा क्रेडिट रेफरन्स एजेन्सी किंवा क्रेडिट ब्युरो) बँकेला दिलेली कोणतीही माहिती किंवा त्याच्या क्रेडिटच्या स्थितीची पडताळणी करण्यासाठी अधिकृत करेल;

तसेच कर्जाचा अर्ज (डेटा प्रक्रियेसह) किंवा वैयक्तिक कर्ज उत्पादन वैशिष्ट्यांच्या संबंधात कोणतीही सेवा प्रदान करण्याच्या उद्देशाने बँक या अर्जाच्या संदर्भातील कोणतीही माहिती (वैयक्तिक माहितीसह) कोणत्याही सेवा प्रदात्याला देऊ शकते (जरी ते भारतात किंवा भारताबाहेर असले तरी) याची पुष्टी करा आणि सहमती दर्शवा; आणि हे सुद्धा जाणून घ्या की उत्पादनासाठी, बँक माझ्या अर्जाची स्थिती ज्यांच्यामार्फत मी माझा अर्ज सादर केला आहे अशा विक्री एजेंट किंवा संस्थांकडे उघड करेल.

13) नियमन कायदा आणि अखत्यारी (अधिकार क्षेत्र). – वैयक्तिक कर्ज हे भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केले जाईल.

वैयक्तिक कर्जामुळे किंवा त्यासंबंधात उद्भवणारे सर्व दावे आणि विवाद लवाद आणि सामंजस्य कायदा, 1996 आणि त्यानंतरच्या कोणत्याही वैधानिक दुरुस्तीच्या तरतुदींनुसार लवादाद्वारे निकालात काढले जातील, जर नमूद कायद्यामध्ये काही असेल तर, बँक्स ॲण्ड फायनॅन्शियल ॲक्ट 1993 मुळे कर्ज वसुलीच्या अधिकारक्षेत्रांतर्गत स्थापन केलेल्या कर्ज वसुली न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात असा दावा किंवा विवाद येत नसेल तर बँकेने नियुक्त केलेल्या एकमेव लवादाद्वारे केले जाईल. कोणताही लवाद निवाडा/निर्देश अंतिम असेल व संस्था पक्षकारांना बंधनकारक असेल. लवादाची भाषा इंग्रजी असेल आणि अशा लवादाचे ठिकाण मुंबई येथे असेल.

14) तुम्ही आम्हाला अर्जासंदर्भात माहिती देताना दिलेली सर्व/कोणतीही माहिती (कोणत्याही कागदपत्रांसह) योग्य, पूर्ण असेल व दिशाभूल करणारी नसेल (असे नसल्यास तुम्ही त्यासाठी वैयक्तिकरित्या जबाबदार असू शकता) याची जबाबदारी घ्या आणि तसे आश्वासन द्या.